# ॥ पोवाडा ॥

वसंत बापट

॥ जय महाराष्ट्र ॥

हे बोल मराठी घेती ज्यांच्या ओठी
ते सर्व मराठे आम्ही साडे पांच कोटी
ऐक्याची शपथ घेऊ या काय मग खोटी
झाकून कधी काळीचे दैन्य भाळीचे दीस सोन्याचे भविष्यापोटी ॥

राज्य मराठी नागपूराहुन गोव्यापर्यंत
पैठण इकडे पसरे तिकडे दर्या अपरांत
तापी वरदा बाहती झुळझुळ तशी वैनगंगा
गोदा भीमा कृष्णा आणिती जीवन रसरंगा ॥

हा दगड फुलांचा मर्द मराठी देश
कणि कोंडा खाया अंगी फाटका वेश
परि नसांनसांतून संचरतो आवेश
स्वातंत्र्यदेवीचे भक्त, उसळते रक्त, इमानी सक्त, साक्ष परमेश ॥

परि मला माझी कस्तुरी, फूलात फूल मोगरी
ये मराठीचे ये घरी, विद्येचा सुकाळू करी
ती अद्‌भुत ज्ञानेश्वरी, तुकोबाची भाव पंढरी
इथे कडे कपारीमधून घुमली शहिरी
घोष जहाल चिपळुणकरी, केशवसूत देती ललकारी
गर्जती टिळक केसरी, हरि भाऊंची कादंबरी
ज्योतिबा जळती अंतरी, अण्णांची नाट्य चातुरी
देवलाची कोणाला करी, पुढे कोल्हटकर गडकरी
पठ्ठेबापू राव फडकरी, शाहीर हैदर लहरी
बालकवी निर्झरापरी, केळकरी नर्म चातुरी
साने गुरुजी भाव निर्झरी, तांब्यांची गोड ललकारी
या मराठिच्या मंदिरी, आसनावरी, थोर कितीतरी
शारदा पुत्र कीर्तीवंत, कवी कथाकार कलावंत, किती शाहीर किती संत ॥

अजंठ्याची कला काय खुले, नाअगपुरात वैभव झुले
वऱ्हाड्यात कपाती उले, कृष्णकिनारी शालू डुले
कोकणची फळे अन फुले, मुंबईला बघुन मन भुले
जय महाराष्ट्र गर्जती धरतीची मुले ॥

मराठ्यांची परंपरा तेजस्वी जाणा
जरा मानाचा आणा अन त्यागाचा बाणा नाही भ्याले मरणा
शिवराय बाजी तानाजी, ते धनाजी नि संताजी
पेशवाई पहिला बाजी, अभिमन्यू परि जनकोजी
राघो भरारी नि महादजी, वो गोखला बापू रण गाजी ॥

सत्तावन सालचे बंड, पेटले चंड,
राहू काय थंड, ठोकुनी दंड
मराठे प्राण देती समरात, मर्दानी झाशीवाली हो त्यात
साहेबाने हाय खाल्ली चित्तात ॥

आमी नेक मराठे हिंदभूमीचे पुत्र
अन पूज्य मान तो एकच हिंदी छत्र
आमुचे आम्हाला घर राहू दे मात्र
जी एक आमुची आस, एक हा ध्यास, यास घोषात करू सर्वत्र

सह्याद्रीचे पिऊनी वारे कृष्णेचे पाणी
वीर मराठे स्वातंत्र्याची गाती जय गाणी ॥

तो प्राण पाखंडी वासुदेव बळवंत
चाफेकर फासावर गेले झाले यशवंत
सावरकर जन्म ठेपेत अंदमानात
सात वर्ष सजा टिळकांना ब्रह्मदेशात
राजगुरू, भगतसिंहाचा छावा स्वर्गात
शिरोड्याला रंगले मीठ मर्द रक्तात
बाबू गेनू शूर वीरांची मरणावर मात
क्रांतिवीर कर्मवीरांचा आमुचा प्रांत
परमवीर चक्र राण्याला पहिले देशात
तो मराठभूचा पुत्र विनोबा संत
या उधान?? थोर कुलवंत, कवि कलावंत, संसारी वसंत

जय जय महाराष्ट्र बोला,  बोला एक तरी बोल बोला
घोष तो भिडवू गगनाला